**महाराष्ट्र शासन**

सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१

Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, २६६३२

फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

जा.क्र.ससं/उशि/पुवि/कोरोना विषाणू प्रादुर्भाव/२०२०/ 483

दिनांक १४.३.२०२०.

प्रति,

१. प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित /कायम विना अनुदानित कला, वाणिज्य,विज्ञान, विधी, शारीरिक शिक्षण व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे आणि पिंपरी चिंचवड हदद .**

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ७.

३. कुलसचिव, डेक्कन कॉलेज व पदव्युत्तर संस्था, येरवडा, पुणे – ६

४. कुलसचिव, गोखले इन्स्टिटयुट ऑफ पॉलिटिक्स, पुणे.

५. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

६. कुलसचिव, भारती विद्यापीठ, पुणे.

७. कुलसचिव, प्लेम विद्यापीठ, पुणे.

८. कुलसचिव, विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे

९. कुलसचिव, अजिंक्य डी.वाय. पाटील विद्यापीठ, पुणे

१०. कुलसचिव,डॉ. विश्वनाथ कराड एमआयडी वर्ल्ड पीस युनिर्वसिटी, पुणे.

११. कुलसचिव, सिम्बॉयसिस स्कील अँड ओपन युनिर्वसिटी, पुणे.

१२. कुलसचिव, डॉ. डी.वाय.पाटील आंतरराष्ट्रीय विद्यापीठ, पुणे.

१३. कुलसचिव, डी.एस.के. वर्ल्ड युनिर्वसिटी, पुणे.

१४. कुलसचिव, स्पायसर ॲडव्हान्टीस्ट युनिर्वसिटी, पुणे

१५. कुलसचिव, एम.आय.टी. आर्ट डिझाईन अँड टेक्नॉलॉजी युनिर्वसिटी, पुणे.

विषय - **कोरोना विषणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणेबाबत..**

संदर्भ - मा. विभागीय आयुक्त, पुणे महसूल यांचेसोबत दिनांक १४.३.२०२० रोजी झालेली बैठक.

आपल्या प्रतिष्ठित व सर्वश्रुत विद्यापीठांमध्ये/शैक्षणिक संस्थेमध्ये व महाविद्यालयांमध्ये देश व देशाबाहेरुन वेगवेगळे विद्यार्थी येत असतात. कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव देशामध्ये व जगामध्ये पसरतो आहे, हे विचारात घेता केंद्र शासनाकडून मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. ते विचारात घेऊन १५ फेब्रुवारी २०२० नंतर बाहेरील देशातून आलेल्या व्यक्तींना कमीत कमी १५ दिवस स्वत:च्या घरामध्ये, जिथे ते राहात आहेत तिथे विलगीकरण/अलगीकरण (Quaraintine) करणे आवश्यक आहे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे बाहेर देशातून आलेले विद्यार्थी व संशोधन सहाय्यक जर वसतिगृहात राहात असतील तर त्यांचे विलगीकरण करण्यासाठी आपल्या विद्यापीठात व विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयांत व शैक्षणिक संस्थांच्यामध्ये वेगळी इमारत/जागा अशाप्रकारे सुनिश्चित करावी की, ज्यामुळे इतर विद्यार्थ्यांचा संपर्क या विद्यार्थ्यांशी

होणार नाही, याची जबाबदारी एखादया अधिका-यास देण्यात यावी व अशा प्रकारे "विलगीकरण कक्ष" (Quaraintine) स्थापन करण्यात यावा. त्यासाठी महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी किंवा ग्रामीण भांगामध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा सल्ला घेण्यात येऊन त्यांच्या पर्यवेक्षकीय नियंत्रणाखाली ही कार्यवाही करावी. जर यापैकी काही व्यक्तींना कोरोना विषाणू प्रादूर्भावाची लक्षणे आढळल्यास त्यांना नायडू हॉस्पिटलमध्ये स्थलांतरीत करण्यात यावे. वरील सूचना आपल्या अधिनस्त विद्यापीठातील अधिका-यांच्या / कर्मचा-यांच्या व महाविद्यालयातील प्राचार्य व इतर कर्मचारी तसेच संबंधितांच्या तात्काळ निदर्शनास आणाव्यात.

महाविद्यालय व शैक्षणिक संस्था बंद ठेवणेबाबत राज्य शासनाकडून धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे, या संस्था व महाविद्यालये शासनाच्या पुढील आदेशापर्यंत बंद राहतील. ज्या विद्यार्थ्यांना सुटटी दिलेली आहे ते अनावश्यकरित्या फिरणार नाहीत तसेच वसतिगृहामध्ये, त्यांच्या घरामध्ये स्वत:ला सुरक्षित ठेवतील. जे विद्यार्थी बाहेर गावाहून आले आहेत त्यांच्या बाबतीत त्यांनी अनावश्यक फिरणार नाहीत ही स्पष्ट सूचना देण्यात यावी अन्यथा त्यांना त्यांच्या मूळ गांवी जाण्याच्या सूचना देण्यात याव्यात. जे विद्यार्थी पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात राहतील त्यांच्या ही बाब निदर्शनास आणावी. कोणी अनावश्यकरित्या शहरात फिरतांना आढळल्यास त्यांच्या विरुध्द कार्यवाही होऊ शकेल याची जाणीव त्यांना दयावी. विद्यापीठांच्या / महाविद्यालयाच्या पूर्वनियोजित परीक्षा तसेच इतर परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच होतील. वर जे बंधन घालण्यात आलेले आहे किंवा शहरामध्ये न फिरण्याच्या ज्या अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत त्या परीक्षार्थींना लागू राहणार नाहीत. त्यासाठी त्यांनी परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉलतिकीट) सोबत बाळगावे व आवश्यक असल्यास ते दर्शवावे. परीक्षांबाबतीत शासनाचे काही वेगळे आदेश प्राप्त झाल्यास तसे कळविण्यात येईल. हे आदेश पुणे व पिंपरी चिंचवड शहरापुरते मर्यादित लागू असतील.

आपला विश्वासू,

14/3/20

(डॉ. मोहन खताळ)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.

प्रत -

१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तारभवन, मुंबई - ३२.
२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१.